**मौजे अंतुर्ली खु. प्र.पा. ता. पाचोरा जि. जळगांव या गावातील नाल्याच्या तिरावर सप्तश्रृंगी मंदिराजवळील, धार्मीक स्थळे, लोकांची घरे व वहिवाट यांचे पूरापासून संरक्षणासाठी पूर संरक्षक भिंत बांधण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: प्रशामा-२०१९/ (प्र.क्र. ३८/२०१९)/ सिं.व्य.(महसूल)**
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक: २७ मे, २०१९.

वाचा :१) शासन परिपत्रक क्र.एफडीडब्ल्यु-१०९२/(१७०)/सिं.व्य.(कामे), दि.७.८.१९९२
२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे पत्र जा. क्र. कासं/तापाविम/प्रशा-७/५८३/सन २०१९ दि. २५.१.२०१९.

**प्रस्तावना :-**

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत मौजे अंतुर्ली खु. प्र. पा, ता. पाचोरा, जि. जळगांव हे गांव नाल्याच्या तिरावर वसलेले आहे. नाल्याच्या तटाजवळच काही लोकांची घरे व धार्मिक स्थळे आहेत. नाल्याच्या पुराच्या विसर्गामुळे सप्तश्रुंगी मंदिरावळील बाजू कोरली गेलेली आहे. त्यामुळे मंदिराजवळच्या वरील बाजूस नाल्याच्या उजव्या तिरावर व आजुबाजूच्या भागातील लोकांच्या मालमत्ता व जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता झालेली आहे. मा. खासदार श्री. ए.टी. (नाना) पाटील, जळगांव यांनी मा. मंत्री (जलसंपदा) यांना केलेल्या विनंतीनुसार व ग्रामपंचायत मौ. अंतुर्ली खु. प्र.पा, ता. पाचोरा यांनी केलेल्या मागणीनुसार पूर संरक्षक भिंतीच्या प्रस्तावाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान देण्याबाबत शासनाच्या विचाराधिन होते.

**शासन निर्णय :-**

१) या शासन निर्णयान्वये तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव अंतर्गत मौजे अंतुर्ली खु. प्र.पा, ता. पाचोरा, जि. जळगांव येथे नाल्याच्या तिरावर सप्तश्रुंगी मंदिराजवळ धार्मिक स्थळे, लोकांच्या मालमत्ता व जिवीतास धोका पोचू नये यास्तव पूरापासून संरक्षणासाठी पुर संरक्षक भिंत बांधण्याच्या कामासाठी रू. २१,१९,४४१/- (रुपये एकवीस लक्ष एकोणीस हजार चारशे एक्केचाळीस मात्र ) एवढया खर्चाच्या किंमतीस खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) शासन परिपत्रक क्र.एफडीडब्ल्यु-१०९२/(१७०)/सिं.व्य.(कामे), दि.७.८.१९९२ मधील तरतुदी नुसार कार्यवाही करावी.

ब) शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू-१०८९/२४३/८९/सिंव्य (कामे), दि. २१.९.१९८९ नुसार पूर रेषा आखणी केल्यानंतरच पूर संरक्षक भिंतीची संरेखा निश्चित करावी.

क) अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे/ संकल्पने, दरसूची बाहय बाबी व वहन अंतरे सक्षम स्तरावर तपासून अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करावी.

ड) कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करावयाचा आहे.

इ) भिंतीच्या बांधकामासाठी भूसंपादन करू नये, बांधकामासाठी आवश्यक जमीन संबंधितांनी विनामोबदला उपलब्ध करून द्यावी, पूर संरक्षक भिंतीच्या बांधकामामुळे नदीप्रवाहाला अडथळा निर्माण होणार नाही याची, दक्षता घ्यावी.

ई) पूर संरक्षक योजना राबविल्यानंतर परिसरातील पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होईल, याची दक्षता नियोजनात घ्यावी.

प) सदर योजना पूर्ण झाल्यानंतर पूर संरक्षक भिंत मौ. अंतुर्ली बु. प्र.पा. ता. पाचोरा, जि.जळगांव ग्रामपचांयतीने ताब्यात घेऊन भविष्यातील देखभाल व दुरूस्ती करावयाची आहे. काम सुरू करण्यापूर्वी तसे लेखी बंधपत्र मौ. अंतुर्ली बु. प्र.पा. ता. पाचोरा ग्रामपंचायतीकडून प्राप्त करून घ्यावे.

फ) सदरच्या कामांचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून काम पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास त्वरीत उपलब्ध करून द्यावे.

२) प्रस्तावित कामासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक- आय -५, ४७११ पूरनियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च,०१ पूर नियंत्रण, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणुका (०१) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भाग भांडवली अंशदान, (०१) (०२) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान ( कार्यक्रम ) (४७११ ०२१८) या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३) या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य. (महसूल) कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये क्र.१४/सन २०१८-२०१९ वर नोंदविण्यात आलेली आहे.

४) वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ नुसार विभागांना असलेले वित्तीय अधिकार व आंतरवित्तीय सल्लागार व सह सचिव यांच्या सहमतीने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१९०५२८१०५४५५९१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.05.28 11:18:13 +05'30'

(अ. अ. कपोले)
उप सचिव महाराष्ट्र शासन

**प्रति-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,

२) मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,

३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई

४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,

५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा,मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,

६) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद ,मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,

७) मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,

८) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई,

९) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई,

१०) प्रधानसचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,

११) सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

१२) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई,

१३) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,नागपूर,

१४) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव,

१५) मुख्यअभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव,

१६) आंतरवित्त सल्लागार व सहसचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,

१७) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगांव

१८) कार्यकारी अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव,

१९) सिं.व्य.(महसूल) कार्यासन संग्रहार्थ.